क्रमांक : ज्येसू-१५२४/लिटं-ता-अं-२४/२२६/प्रशा-२/ 9590
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन,
प्रशासकीय इमारत, आठवा मजला,
मुंबई उपनगर जिल्हा, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दिनांक : 08/12/2024

परिपत्रक

**विषय :- लिपिक टंकलेखक, गट-क संवर्गात दिनांक १/१/२०२३ ते ३१/१२/२०२३ या कालावधीत नियमित/तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची तात्पुरती ज्येष्ठतासूची प्रसारीत करणेबाबत.**

संदर्भ :- (१) सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्रमांक एसआरव्ही २०१६/प्र.क्र.२८१/बारा, दि.२१/६/२१
(२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही २०१६/प्र.क्र.२८१/कार्या-१२, दि.१३/७/२१

महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१, सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना, दिनांक २१ जून २०२१ नुसार संचालनालयाच्या लिपिक टंकलेखक, गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक १/१/२०२३ ते ३१/१२/२०२३ या कालावधीत नियमित/तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची तात्पुरती ज्येष्ठतासूची संचालनालयाच्या http://mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसारीत केली आहे.

२. या परिपत्रकान्वये सर्व संबधित कर्मचाऱ्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संकेतस्थळावर प्रसारीत केलेल्या तात्पुरत्या ज्येष्ठता सूचींबाबत त्यांचे काही वास्तविक आक्षेप अथवा त्रुटी (नांव, जन्मदिनांक, प्रवर्ग, रुजू दिनांक, ज्येष्ठता इत्यादी) असल्यास ते आक्षेप / त्रुटी हे परिपत्रक निर्गमित झालेल्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत संचालनालयाकडे त्यांच्या कार्यालयप्रमुखामार्फत पाठवावेत व एक आगाऊ प्रत संचालनालयास परस्पर पाठविण्यात यावी. आक्षेप कळविताना आपला ज्येष्ठताक्रम आक्षेपात नमूद करावा. जन्मदिनांक तद्वतच जातीच्या प्रवर्गासंबंधी आक्षेप असल्यास सेवापुस्तकाच्या पहिल्या पृष्ठाची, शाळा सोडल्याच्या दाखल्याची व जातीचे प्रमाणपत्र/जातीचे वैधता प्रमाणपत्र यांची साक्षांकित प्रत अर्जासोबत संचालनालयास पाठविण्यात यावीत. मुदतीनंतर पाठविण्यात आलेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

३. ज्या कर्मचाऱ्यांची जाती दावा पडताळणीची प्रकरणे प्रलंबित आहेत/जाती दाव्याची पडताळणी झालेली नाही अशा कर्मचाऱ्यांच्या जाती दावा पडताळणीचा निर्णय प्राप्त होईपर्यंत त्यांची ज्येष्ठता अस्थायी स्वरुपातील असून त्यांच्या ज्येष्ठता सूचीतील जातीच्या नोंदी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून जात वैधता प्राप्त होईल या अटीस राहून नोंदल्या आहेत.

४. सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक २०/४/२०२१ नुसार पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे सेवाज्येष्ठतेनुसार भरण्याबाबत मार्गदर्शनपर सूचना दिलेल्या आहेत. मार्गदर्शनपर सुचनेनुसार तुर्तास पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात येतात. त्यामुळे याबाबत अंतिम आदेश प्राप्त झाल्यानंतर प्रकरणपरत्वे सदर ज्येष्ठतासूचीतील कर्मचाऱ्यांच्या ज्येष्ठताक्रमामध्ये बदल होऊ शकतो, याची नोंद घ्यावी.

५/- प्रस्तुत परिपत्रक मिळाल्याची पोच उलट टपाली संचालनालयास संबंधित कार्यालयामार्फत पाठविण्यात यावी.

(नि.म.प्रभुदेसाई)
उप संचालक (प्रशासन)
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

प्रति,
श्री./श्रीमती ------------------------------------
लिपिक टंकलेखक
--------------------------------------------------
--------------------------------------------------

कृ.मा.प.

d:\chhaya\ज्येष्ठतासूची\ज्येष्ठतासूची परिपत्रक.docx- ८५ -

प्रत :

१. सह संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय (सर्व) - सदरचे परिपत्रक लिपिक टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांना देण्यात यावे व त्याबाबतची पोच त्यांच्याकडून घेऊन संचालनालयास पाठविण्यात यावी.

२. उपसंचालक, जिल्हा सांख्यिकी कार्यालय (सर्व) - सदरचे परिपत्रक जिल्हा सांख्यिकी कार्यालय तसेच जिल्ह्यातील या यादीत समाविष्ट नसलेल्या इतर कार्यालयातील लिपिक टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांना देण्यात यावे व त्याबाबतची पोच त्यांच्याकडून घेऊन संचालनालयास पाठविण्यात यावी.

३. कक्ष अधिकारी (का-१४२६), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

**संवर्गाचे नाव - लिपिक टंकलेखक**

**वेतनश्रेणी - S-६ : १९९००-६३२००**

**दिनांक १ जानेवारी, २०२३ ते ३१ डिसेंबर, २०२३ या कालावधीची तात्पुरती ज्येष्ठतासूची**

| नियम ३ (२) (ब) नुसार ज्येष्ठता क्रमांक | शासकीय कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्तीचा मार्ग | जन्मदिनांक | प्रवर्ग | नियम ३ (२) (अ) नुसार संवर्गात प्रत्यक्ष रुजू दिनांक | ज्येष्ठतेचा दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | श्री.उमेश गोविंदराव बावणेर | ना | २८-०५-१९८७ | अजा | १५-०६-२०२३ | १५-०६-२०२३ | ३१-०५-२०४५ | |
| २ | श्री.मयुर भास्कर बडेकर | ना | १६-१२-१९९२ | अजा | १८-०२-२०१६ | ०६-१०-२०२३ | ३१-१२-२०५० | सेवाज्येष्ठता पुनर्निश्चित/ अतिरिक्त संधीत उत्तीर्ण |
| ३ | श्री.सुनिल रत्नाकरराव भोसले | ना | १२-१२-१९८७ | खुला | २५-०७-२०१६ | ०६-१०-२०२३ | ३१-१२-२०४५ | सेवाज्येष्ठता पुनर्निश्चित/ अतिरिक्त संधीत उत्तीर्ण |

- ना नामनिर्देशन
- प पदोन्नती

(नि.म.प्रभुदेसाई)
उप संचालक (प्रशासन)
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.